# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 02/03/2020 (सोमवार)
# (सायंकाळ)

---

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. देवलापार :– दिनांक 01/03/2020 रोजी गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, देवलापार व रामटेक पोलिस स्टेशनच्या सिमेवर डोंगर परिसरात बसलेले मुरडा गावात होळी निमीत्त मोठया प्रमाणात दारू साठा काढणार आहेत. या माहितीच्या आधारे पोनि श्री दिलीप ठाकुर ठाणेदार पो. स्टे. रामटेक, सपोनि श्री प्रविण बोरकुटे, ठाणेदार पो. स्टे. देवलापार हे स्टाफसह मुरडा जंगलशिवारात दारू बाबत रेड करणे कामी मुसेवाडी ग्रामदलातील महिलांसह गेले होते. स्टाफसह पोलिस पथक गेले असता ते पोलिसांना पाहुन पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता त्यातील दोन इसम आरोपी नामे– 1) ज्ञानेश्वर अर्जन कोकोडे, वय 35 वर्ष व 2) ईसराम पैकु वरखडे, वय 60 वर्ष यांना स्टाफने पकडले. त्यांना पळुन गेलेल्या इसमांबाबत विचारपुस केली असता त्यांनी पळुन जाणारे हे मुरडा येथिल पिंटु चौके, शिवा वाढीवे, हिरालाल, अक्षय सलामे सर्व रा. मुरडा यांची असल्याचे सांगितले. पोलिस पथकानी परिसराची पाहणी केली असता मोठया प्रमाणात दारूचा साठा मिळुन आला. परिसरात एकुण 160 प्लास्टिक कॅन, 110 मातीचे मडके, 70 प्लास्टिकच्या चुंगळया तसेच 12 मोठ मोठया खंडयामध्ये प्लास्टिक मध्ये गुंडाळुन सडु घातलेला एकुण 30,150 लिटर मोहाफुल सडवा रसायन कि. 93,000/–रू. तसेच घटनास्थळी मिहुन आलेले प्लास्टिक आणि लोखंडी ड्रम व इतर दारू काढण्याचे साहित्य 2,05,000/–रू. असा एकुण 33,13,000/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि प्रविण बोरकुटे, पोलीस स्टेशन देवलापार येथे आरोपीतांविरूध्द 65 इ एफ सी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले. दोन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सपोनि श्री. प्रविण बोरकुटे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीमती नयन आलुरकर यांचे नेतृत्वात पोनि श्री दिलीप ठाकुर पो. स्टे. रामटेक, सपोनि. श्री. बोरकुट पो. स्टे. दुवलापार, पोस्टे रामटेक व देवलापारचा पोलिस स्टाफ व मुसेवाडी येथिल ग्रामरक्षक महिला मंडळ यांचे मदतीने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



# अवैधरीत्या विदेशी दारुची
# वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 2 फर्लांग अंतरावर भिसी नाका चौक उमरेड येथे दिनांक 01/03/2020 चे 14.00 वा. ते 14.45 वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा,ना.ग्रा यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम हा सिल्व्हर रंगाच्या सेन्ट्रो कार क्र– एम.एच– 35/ एच– 1638 मध्ये विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने घटनास्थळी नाकाबंदी केली असता सदर वाहनास थांबवून चेक केले असता कार मधील आरोपी नामे– अनिल सुखदेव पराते, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 सिंसी ता. उमरेड याच्या कडुन विनापरवाना व अवैधरीत्या 19 बम्पर विदेशी दारू व 41 निपा विदेशी दारु किंमती 19,150/– रू. असा एकुण वाहनासह– 1,29,150/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस हवालदार श्री. संतोष पंधरे, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. अरूण जयसिंगपुरे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोहवा श्री. मदन आसतकर, पोलिस शिपाई राधेश्याम कांबळे, बालीजी साखरे व चालक पोहवा भाऊराव खंडाते यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर